# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 187/2023 दिनांक : 12.05.2023

## 1)जबरी चोरी :-

**शिवाजीनगर** :-दिनांक 11.05.2023 रोजी चे 05.30 वा. चे सुमारास, **संजीवनी हॉस्पीटल मागील सार्वजनिक रोडलगत रेल्वे पटरी जवळ. नांदेड येथे,** फिर्यादी हे शौचालयासाठी संजीवनी हॉस्पीटलच्या बाजुस असलेल्या रेल्वे पटरीकडे जात असतांना अज्ञात चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीकडे धावत जावुन पकडुन लाकडी काटीचा धाक दाखवुन दाबुन धरून रोडलगत उतारावर घेवुन जावुन त्यांच्याकडील नगदी 60,000/-रूपये व एटीएम कार्ड,पॅन कार्ड,अधार कार्ड असा एकुण 60,000/-रूपयाचा ऐवज जबरीने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी तुळशीराम बबनराव मांडगे, वय 30 वर्षे, व्यवसाय शेती रा.बेलवाडी ता.जि.हिंगोली** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 144/2023 कलम 392, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री गायकवाड, मो.क्रं. 9370933727** हे करीत आहेत.

## 2)घरफोडी :-

**1)नायगाव** :- दिनांक 10.05.2023 रोजी चे 17.00 ते दि. 11.05.2023 चे 08.00 वा. चे दरम्यान, **जांभळेनगर नायगाव ता.नायगाव जि.नांदेड येथे**, यातील अज्ञात चोरटयाने फिर्यादी चे घराचे प्रवेशव्दाराचे कुलुप तोडुन आत प्रवेश करून बेडरूम मधील कपाटातील लॉकर चे लॉक तोडुन कपाटातुन एकुण 250000/-रूपयाचा मुद्येमाल चोरून नेला. वगैरे **फिर्यादी नवनाथ बालाजी मोरे, वय 30 वर्षे, व्यवसाय शेती रा.टाकळी ह.मु.जांभळे नगर ता.नायगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नायगाव** गुरन 65/2023 कलम 454, 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोनि/श्री गुट्टे, मो.क्रं. 8425995454** हे करीत आहेत.

**2)लोहा** :- दिनांक 08.05.2023 रोजी चे 13.00 ते दि. 11.05.2023 दरम्यान, **फिर्यादीचे राहते घरी शिवकल्याण नगर लोहा ता. लोहा जि.नांदेड येथे**, यातील फिर्यादीच्या घराचे मुख्य दरवाजाचे कुलूप कोंडा तोडुन आत प्रवेश करून कपाटाच्या लॉकरमध्ये ठेवलेले सोन्याचे जुने वापरते दागिने 20 ग्रॅम अंदाजे किंमती 30,000/-रूपयाचा व चांदीचे दागिने 38 तोळे जुने वापरते किंमती 15,000 रूपये व नगदी रोख रक्कम 14,000 असा एकुण 59,000/-रूपयाचा ऐवज कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी नागेश बालाजी दमकोंडवार, वय 43 वर्षे, व्यवसाय शेती व व्यापार रा. शिवकल्यान नगर लोहा ता.लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरन 113/2023 कलम 454, 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/सुर्यवंशी, मो.क्रं. 7057524134** हे करीत आहेत.

**3)वजीराबाद** :- दिनांक 29.04.2023 रोजी ते दि. 11.05.2023 दरम्यान,लेखाधिकारी (शिक्षक).**तथा वरिष्ठ लेखापरीक्षक कार्यालय केआरएम महिला विद्यालय मल्टीपर्पज नांदेड येथे**, यातील फिर्यादीने दि.29.04.2023 ते दि.01.05.2023 रोजी कार्यालयात सुट्टी असल्याने कार्यालय बंद करून घरी गेले दि.29.04.2023 ते दि.11.05.2023 च्या दरम्यान कार्यालयाचा दरवाजा तोडुन डेल कंपनीचा लॉपटॉप जुना वापरता किंमती 28,000 /- रूपये व ॲडेड रिपोर्ट असा एकुण 28,000/-रूपयाचा ऐवज कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी पंडित गोविंद चव्हाण, वय 49 वर्षे, व्यवसाय नोकरी रा.बान्हमसिंघनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजीराबाद** गुरन 165/2023 कलम 454, 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2267 शिंदे, मो.क्रं. 7498883410** हे करीत आहेत.

## 3) चोरी :-

**वजीराबाद** :-दिनांक 11.05.2023 रोजी चे 13.25 ते वा. चे सुमारास, **मध्यवर्ती बसस्थानक नांदेड येथे,** यातील फिर्यादी ही नांदेड ते वारकवाडी येथुन माहेरी जाण्यासाठी मध्यवर्ती बसस्थानक नांदेड येथे बसमध्ये चडत असतांना फिर्यादीच्या पर्स मधील दरगीने मिनीगंठन 02 तोळा,लॉग गंठन 01 तोळा,अंगठी 5 ग्रॅम,मनी 05 ग्रॅम,कानातले 05 ग्रॅम,झुमके 05 ग्रॅम,मनी 05 ग्रॅम ,ओमचे पान 01 ग्रॅम,मनी मंगळसुत्र 01 ग्रॅम असे एकुण 05 तोळे 3 ग्रॅम किंमती 2,12,000/-रूपयाचा माल कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी पंचफुला चंद्रकांत केंद्रे , वय 34 वर्षे, व्यवसाय घरकाम रा.सहयोगनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 166/2023 कलम 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1842 कत्ते, मो.क्र. 9850846220** हे करीत आहेत.

**रामतिर्थ** :—दिनांक 11.05.2023 रोजी चे 16.30 ते 17.00 वा. चे दरम्यान, **नरसी बसस्थानक नांदेड येथे**, यातील फिर्यादी ही नातीचे मुलीचे लग्नाला मदत म्हणुन मुलीस 50 हजार रूपये देण्याकरिता नरसी बस स्थानक येथुन देगलुर कडे जाणारे बस मध्ये चढत असतांना यातील अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे बनियानचे खिशामध्ये ठेवलेले 50 हजार रूपये बनियन चा खिसा कापुन चोरून नेले वगैरे **फिर्यादी लक्ष्मण बानना येरमोड, वय 65 वर्षे, व्यवसाय शेती रा.रूद्रापुर ता.बिलोली जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे रामतिर्थ** गुरनं 73/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेक/2441 आडे, मो.क्र.9923592441** हे करीत आहेत.

**भाग्यनगर** :—दिनांक 06.05.2023 रोजी चे 01.22 वा. चे सुमारास **ज्ञानेश्वरनगर नांदेड**, यातील फिर्यादीचे आबिओ फाय जी चे कार्ड व इंडज आयडी चे बेस्टबॅड कार्ड असा किंमती 30,000/—रूपयाचे कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी मधुकर रमेश गायकवाड, वय 28 वर्षे, व्यवसाय नोकरी निशा ग्रुप ऑफ कंपनी हडपसर पुणे ह.मु.रा. शिवरावनगर परभणी** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 179/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोहेकॉ/ 2309 जाधव, मो.क्र. 9049343095** हे करीत आहेत.

## 4)गंभीर दुखापत :—

**इतवारा** :—दिनांक 10.05.2023 रोजी चे 01.00 वा. चे सुमारास, **रंगारगल्ली येथील पिंपळाच्या झाडाजवळ इतवारा नांदेड येथे**, यातील फिर्यादी हा दि. 10.05.2023 रोजी 01.00 वाजताचे सुमारास रंगार गल्ली येथुन जात असतांना पिंपळाचे झाडाजवळ यातील आरोपीतांनी गोंधळ करित असल्याने आरोपीतांना फिर्यादी यांनी गोंधळ का करता म्हणुन विचारपुस केल्याने आरोपीतांनी संगणमत करून निशात वावळा यांने त्याचे हातातील घातक शस्त्राने (क्रिकेटखेळण्याच्या स्टंपने) फिर्यादीचे डोक्यात मारून डोके फोडुन गंभीर दुखापत केली डाव्या डोळयाजवळ व डाव्या हाताचे अंगठया जवळ मारहान करून दुखापत केली व त्याचा भाऊ मोग्या यांने शिवीगाळ करीत जिवेमारण्याची धमकी दिली वगैरे **फिर्यादी सुरज सुधीरराव सारंगधर, वय 29 वर्षे, व्यवसाय खजगी नोकरी रा. विषालनगर मोरचौक नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरन 144/2023 कलम 326, 323, 504, 506, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2364 वाडीयार, मो. नं.** हे करीत आहेत.

## 5)अपघात :—

**मुदखेड** :— दि. 11.05.2023 रोजी चे 09.00 वा. चे सुमारास, **निवघा ता.मुदखेड जि. नांदेड येथे**, यातील **मयत नामे साहेबराव किशन भालेराव, वय 35 वर्षे, रा.निवघा ता.मुदखेड जि. नांदेड** यातील मयत हे गावाकडुन मुदखेड येथे येत असताना सिता नदीचे जवळील कॉर्नरवर यातील अज्ञात वाहनाने जोराची धडक दिल्याने जखमी झाल्याने विलाज कामी स. द.विष्णुपुरी नांदेड येथे शरिक असतांना मरण पावला तरि यातील वाहन चालक हा हयगय व निष्काळजीपणे भरधाव वेगात आपले ताब्यातील वहान चालवुन जोराची धडक देवुन त्याचे मरणास कारणीभुत झाला वगैरे **फिर्यादी किशन शंकर भालेराव , वय 70 वर्षे, व्यवसा मजुरी रा.निवघा ता.मुदखेड. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुदखेड** गुरनं.108/2023 कलम 279,304(अ) भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री अंनत्रे, मो.क्र. 9923199861** हे करीत आहेत.

## 6)जुगार :—

**1)भोकर** :— दिनांक 11.05.2023 रोजी 17.55 वा. चे सुमारास,**पोमनाळकर कॉलनी गणपत नर्तावार यांचे खोलीमध्ये ता. भोकर जि.नांदेड येथे**, यातील आरोपने बिना परवाना बेकायदेशिररित्या कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 18,890/—रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/ज्ञानेश्वर आनेराव सरोदे, ने. पोस्टे भोकर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं 167/2023 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास** सपोउपनि/**जाधव, मो.क्रं. 860543065** हे करीत आहेत.

**2)वजीराबाद** :— दिनांक 10.05.2023 रोजी 23.30 वा. चे सुमारास, **ॲक्सीस बॅकेचे बाजुला नांदेड येथे**, यातील आरोपितांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या नाईट डे नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 9,500/—रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/जयश्री विठ्ठल गिरे, ने. पोस्टे वजिराबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 164/2023 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास** पोहेकॉ/**1020 आडे, मो.क्रं. 9823467191** हे करीत आहेत.

**3)भोकर** :— दिनांक 11.05.2023 रोजी 18.30 वा. चे सुमारास, **मोंढा येथिल कृष्णमंदीर समोर भोकर जि.नांदेड येथे**, यातील आरोपिने बिना परवाना बेकायदेशिररित्या कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 18,0500/—रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी सपोउपनि/दिलीप गोविंद जाधव, ने. पोस्टे भोकर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं 168/2023 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास** सपोउपनि/**दिलीप जाधव, मो.क्रं. 8606130645** हे करीत आहेत.

**4)भोकर :—** दिनांक 11.05.2023 रोजी 18.50 वा. चे सुमारास,**पवार कॉलणी कडे जाणारे रोडवरील मारोती मंदीराचे समोरील मोकळया जागेत,** यातील आरोपिने बिना परवाना बेकायदेशिररित्या कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 708500/—रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/सोनाजी जळबाजी कानगुले, ने. पोस्टे भोकर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं 169/2023 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/दिलीप जाधव, मो.क्रं. 8606130645** हे करीत आहेत.

# 7)प्रोव्हिबीशन :—

**1)मुदखेडः—** दिनांक 11.05.2023 रोजी 06.30 वा. चे सुमारास, **चिली पिंपरी शिवारात ता.मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या हातभट्टी गावठी दारू किंमती 16,000/—रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/मधुकर व्यंकटीराव पवार,. ने. पोस्टे मुदखेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुदखेड** गुरनं 109/2023 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास** पोहेकॉ/**2721 शिंदे मो.नं. 9552516283** हे करीत आहेत.

**2)तामसाः—** दिनांक 11.05.2023 रोजी 12.30 वा. चे सुमारास, **हादगाव रोडवरील कोळगाव पाटी जवळ नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंग्री संत्रा किंमती 3360/—रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोनि/श्री.मुंजाजी नामदेव दळवे,. ने. पोस्टे तामसा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे तामसा** गुरनं 46/2023 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/सुर्यवंशी मो.नं.** हे करीत आहेत.

# 8)गळफास घेवुन मृत्यु :—

**कंधार :—**दिनांक 11.05.2023 रोजी चे 15.00 ते 15.45 वा. चे सुमारास, **मौजे रहाटी शिवारातील शंकर पाटील यांचे शेतात जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे माधव बालाजी कौशल्ये, वय 49 वर्षे, रा. राहटी जि. नांदेड,** यांनी शेतातील सततची नापिकी व कर्जास कंठाळुन गळफास घेवुन आत्महत्या केला. वगैरे **खबर देणार शिवराज तोलाबा बारसे, वय 40 वर्षे, व्यवसाय शेती रा.राहटी ता.कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे कंधार** आ. मृ.**15**/2023 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री लोणीकर, मो.नं. 9421769882** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 188/2023 दिनांक : 12.05.2023

नांदेड पोलीस दलातील पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी/शाखा प्रभारी अधिकारी यांचे होणारे वारंमवार बदल्या, ते झाल्या नंतर पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी/शाखा प्रभारी अधिकारी यांचे वारंवार मोबाईल नंबर बदलत असल्याने जनतेची अडचण लक्षात घेवून **मा. श्रीकृष्ण कोकाटे, पोलीस अधिक्षक, नांदेड,** यांचे संकल्पनेतुन नांदेड जिल्हा पोलीस दलातील पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी/शाखा प्रभारी अधिकारी, उप विभागीय पोलीस अधिकारी यांना नांदेड पोलीस दलातर्फे कायमस्वरूपी मोबाईल नंबर देण्यात आला आहे. जनतेस आपल्या कामानिमीत्ताने व तात्काळ मदत होण्याचे दुष्टीने पोलीसांची तात्ताळ मदत व्हावी सदर मोबाईल नंबर देण्यात आले आहेत.

सदर मोबाईल नबंर पोलीस स्टेशन शाखा यांना देण्यात आले असुन **मा. श्रीकृष्ण कोकाटे, पोलीस अधिक्षक,** नांदेड,यांचे हास्ते व **मा. श्री अबिनाश कुमार**, अपर पोलीस अधिक्षक नांदेड, **डॉ अश्विनी जगताप**, पोलीस उप अधिक्षक (मु) नांदेड,सपोनि शिवाजी लष्करे जनसंपर्क अधिकारी , पोउपनि गंगाप्रसाद दळवी सायबार पोलीस स्टेशन नांदेड यांच्या उपस्थितीत उदघाटन करण्यात आले.सदर मोबाईल नबंरचा उपक्रम राबवीण्यासाठी **मा. श्रीकृष्ण कोकाटे, पोलीस अधिक्षक,** नांदेड,यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस स्टेशन नांदेड येथील अधिकारी व अमंलदार यांनी परिश्रम घेतले.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड


नांदेड जिल्हयातील वरिष्ठ पोलीस अधिकारी व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांचे कायमचे संपर्क क्रमांक.